**नि.दि.दा.क्र.३२४/२०१८**
**प्रकाश बाबर व १ वि. बबन पडवळकर व २**

## निशाणी १५ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक होऊन दावा मिळकतींच्या मोजणी बाबत आदेश होणे करीता दाखल केला आहे.

२. वादींच्या मते वादींनी प्रस्तूतचा दावा जाहीर ठराव होउन मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला असून, प्रतिवादी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत असून दावा मिळकतीवर हक्क सांगत आहे. वादी प्रतिवादी यांच्यामध्ये वाद कायमचा मिटण्यासाठी दावा मिळकतीची मोजणी होणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे, असे नमूद करुन प्रस्तूत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही. सबब, त्यांच्या म्हणणे शिवाय अर्ज पुढे चालविण्यात आला.

४. दाव्याचे अवलोकन करता वादींनी प्रतिवादी विरुध्द वाद मिळकतीमध्ये अतिक्रमणाच्या तक्रारी केल्या असून, दक्षिण बाजूने बांध पोखरल्याचे नमूद केले आहे. या शिवाय वादीने दावा मिळकतीची खाजगी मोजणी करुन घेतली असता, प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीत चार पाच फुट रुंदीचे अंतरावर अतिक्रमण केल्याचे दिसून आल्याचे नमूद केले आहे. वादी प्रतिवादीमध्ये तक्रारी होउन त्यांच्यातील वाद पोलीस ठाण्यापर्यंत गेल्याचेही नमूद केले आहे. जरी, प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल केले नसले तरीही दाव्याचे स्वरुप पाहता वादी प्रतिवादीमध्ये जमीनीच्या हद्दीबाबत व क्षेत्राबाबत वाद असल्याचे स्पष्ट होते. दाव्याचे स्वरुप पाहता, अंतिम न्यायनिर्णयाच्या निराकरणासाठी दावा मिळकतीच्या क्षेत्रानुषंगाने तज्ञ इसमांचा अहवाल अभिलेखावर असणे आवशक आहे. त्या शिवाय प्रस्तूत दाव्यातील वादाचे निराकरण करता येणार नाही. परंतू वादी व प्रतिवादीमधील वाद पाहता दोघांच्याही जमीनीची मोजणी होणे आवशक आहे. सबब, प्रस्तूत अर्जातील कथेन, वादी प्रतिवादी यांच्यामधील दाव्याचे स्वरुप व परिस्थिती लक्षात घेता, प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उप अधिक्षक भूमी अभिलेख, पंढरपूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे कासेगाव येथील दावा मिळकत गट क्र. १४५५/3अ/२, १४५५/३ब/१/अ, १४५५/३ब/१/ब आणि १४५५/३/ब/२ या संपूर्ण जमिनींची मोजणी करावी.

४. न्यायालयीन आयुक्तांनी उपरोक्त जमीनींची मोजणी करुन, दावा मिळकतीच्या हद्दी खुणा कायम करुन व प्रतिवादींच्या ताब्यात किती जमीन आहे व सदर जमिनीवर कोण व किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे ते नावासह व क्षेत्रासह मोजणी नकाशात नमूद करावे.

५. न्यायालयीन आयुक्तांनी उपरोक्त आदेशाप्रमाणे मोजणी करुन अतिक्रमणाचा सविस्तर अहवाल नकाशासह सादर करण्याचा आहे.

६. वादी यांनी सदरची मोजणी फी संबंधीत कार्यालयात तत्पर जमा करणेची आहे.

७. आदेशाप्रमाणे मोजणी कामी जर न्यायालयीन आयुक्तांना कोणतीही तांत्रीक अथवा इतर अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधीत न्यायालयाशी पत्रव्यवहार करुन योग्य ते मार्गदर्शन घ्यावे.

८. न्यायालयीन आयुक्त यांनी संबंधीत पक्षकार व त्यांचे वकीलांना प्रत्यक्ष पाहणी करण्यापूर्वी नोटीस व पूर्व कल्पना दयावी.

९. येणे प्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांना आदेशीका दयावी व आवशक ती सर्व कागदपत्रे त्यासोबत जोडून पाठवावी.

(एस.एस.खरोशे.)

दिनांक १०.११.२०२१. सह. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पंढरपूर